छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ अंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरणासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, पुणे येथे Pool Bank Account सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सहकार विभाग
शासन निर्णय क्र.जिमस०७२६/प्र.क्र.१४३/२-स
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०२.११.२०२६

संदर्भ:- १. शासन निर्णय, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. कृकमा ०६१७/प्र.क्र.१२७/२-स, दि. २८.०६.२०१७
२. सहकार आयुक्त व निबंधक यांचे पत्र क्र. कृषीपत-६/छशिमशेसयो/बँक खाते/२०२६/१७७७, दिनांक ११.०८.२०२६

प्रस्तावना:-

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ ही योजना संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत कर्जमाफी, एकवेळ समझोता (OTS) व प्रोत्साहनपर लाभ या घटकांचा समावेश आहे.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ या योजनेअंतर्गत् पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देणे बाकी आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी महाआयटी या संस्थेची नियुक्ती करण्यात आली असून सदर अंमलबजावणी ऑनलाईन संगणकीय प्रणालीव्दारे करण्यात येत आहे. या प्रणालीमध्ये शेतकऱ्यांच्या आधार क्रमांकावर आधारीत संगणकीय संस्करण करण्यात येऊन पात्र शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे व महाआयटी या संस्थेमार्फत पात्र शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने डिबीटीव्दारे लाभाची रक्कम हस्तांतरीत करण्यात येणार आहे.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी संदर्भाधीन क्र. २ येथील पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना लाभ वितरीत करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, पुणे येथे Pool Bank Account सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना लाभ वितरीत करण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांचे नावे **"स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा,**

पुणे” येथे Pool Bank Account उघडण्यास खालील अटीच्या अधीन राहुन शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ या योजनेमधील कर्जमाफी, एकवेळ समझोता (OTS) व प्रोत्साहनपर अंतर्गत देण्यात येणारा लाभ Pool Bank Account व्दारे थेट शेतकऱ्यांच्या कर्जखात्यामध्ये जमा करणे बंधनकारक असेल.
२. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यामध्ये जमा केला जाणारा निधी Pool Bank Account मध्ये २४ तासांपेक्षा जास्त काळ पडून राहणार नाही याची सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांनी व बँकेने दक्षता घ्यावी.
३. शासनाच्या निर्देशानुसार ज्या विशिष्ट प्रयोजनासाठी सदर खाते उघडण्याचे प्रस्तावित आहे त्याच विशिष्ट प्रयोजनासाठी उपयोग करण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीत अन्य प्रयोजनासाठी सदर खात्याचा वापर करण्यात येवू नये.
४. सदर खात्याच्या संदर्भात रोख वही (cash book) अद्ययावत ठेवणे अनिवार्य राहील.
५. सदर बँक खात्यातील शिल्लक रक्कमा व त्या रकमेवरील प्राप्त झालेले व्याज समुचित शासन खाती भरणा करणे आवश्यक असल्यास लागू असलेल्या नियम-विनियम यानुसार त्याप्रमाणे कार्यवाही करणे अनिवार्य राहील.
६. सदर बँक खात्यातील व्यवहाराचे मासिक ताळमेळ करणे तसेच लेखा परिक्षण अनिवार्य राहील.
७. सदर बँक खात्यात दिर्घकाळ निधी विनावापर पडून राहणार नाही या दृष्टीने दक्षता घेण्यात यावी.
८. विवक्षित प्रयोजन संपुष्टात आल्यानंतर सदर बँक खाते तात्काळ बंद करणे आवश्यक राहील.
९. सदर बँक खात्याच्या संदर्भात महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम क्र. (३), (८), (१३) व (१५) तसेच मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियम ७ अन्वये विहित करण्यात आलेल्या तरतूदींचे काटेकोर अनुपालन करणे आवश्यक आहे.
१०. वित्त विभागाच्या दि. ०३.१०.२०२३ व दि. २५.०६.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे अनुपालन करण्यात यावे.
११. वित्तीय औचित्याची सूत्रे आणि वित्तीय शिस्तीचे काटेकोर पालन करण्यात यावे.

२. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५२०/२०२६/व्यय-२, दि.०१.०९.२०२६ व अनौपचारिक संदर्भ क्र.२६६/२०२६ /कोषा प्रशा-५, दि. २९.०९.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६११०२१६०२००७३४७ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=CA7846?BCC4594E1E11741A7962A7A83FEAFB176442575037160FC343C4AE5AB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA6167409EF6D52C9438F775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2026.11.02 16:03:00 +05'30'

(संतोष पाटील)
अपर निबंधक तथा सहसचिव,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

४) मा. उपमुख्यमंत्री (रा.ऊ.शु.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

५) मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)

६) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई

७) मा. विधानसभा / मा. विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई

८) प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई

९) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र मुंबई

१०) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर

११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर

१२) वित्त विभाग (व्यय-०२/ कोषा प्रशा/५), मंत्रालय, मुंबई

१३) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१४) मुख्य महाप्रबंधक, भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई

१५) मुख्य महाप्रबंधक, नाबार्ड, प्रादेशिक कार्यालय, पुणे

१६) चेअरमन, राज्य स्तरीय बँकर्स समिती, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे

१७) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

१८) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

१९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (सर्व)

२०) चेअरमन/सचिव, विविध कार्यकारी सहकारी संस्था (सर्व)

२१) निवडनस्ती (कार्यासन २-स).